**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.कृष्णा विश्वनाथ जंगम
मु.पो.ता.वाळवा, जिल्हा सांगली — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा सहाय्यक कामगार आयुक्त,
सहाय्यक कामगार आयुक्त यांचे कार्यालय,
उद्योग भवन, विश्रामबाग, सांगली — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा सरकारी कामगार अधिकारी,
सहाय्यक कामगार आयुक्त यांचे कार्यालय, उद्योग भवन, विश्रामबाग, सांगली

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २७८ / सांगली / २००७ |
| २ | सुनावणीची तारीख | दि.३०. ८ .२००८ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.कृष्णा विश्वनाथ जंगम
मु.पो.ता.वाळवा, जिल्हा सांगली

**अपिलीय प्राधिकारी** तथा सहाय्यक कामगार आयुक्त, सहाय्यक कामगार आयुक्त यांचे कार्यालय, उद्योग भवन, विश्रामबाग, सांगली विद्यमान-श्री.अ.आ.भिसे
तत्कालीन श्री.सु.बा.बागल

**जन माहिती अधिकारी** तथा सरकारी कामगार अधिकारी, सहाय्यक कामगार आयुक्त यांचे कार्यालय, उद्योग भवन, विश्रामबाग, सांगली श्री.तु.सा.टेके

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २२.११.२००६ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. १९.१२.२००६ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. १३.१.२००७ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. २२.२.२००७ |
| ८ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**<br><br>हुतात्मा किसन अहिर साखर कारखाना लि., वाळवे, ता.वाळवा, जि.सांगली यांच्याकडील कामगारांना फॉर्म डी नियम पाचप्रमाणे कर्मचाऱ्यांना प्रती वर्षी अदा केलेला बोनस याचे अभिलेख ठेवले आहेत का? सन १९९८ ते २००६ या काळात तपासणी केली आहे का. असल्यास अहवाल. शेरे पुस्तकाच्या नोंदीच्या छायांकित प्रती. आपल कार्यालयाकडील संबंधित आस्थापनेस जाण्याबाबतचे हालचाल आदेश. कारखान्याला जात असताना नोंदवहीत नोंद केलेल्या रेकॉर्डची छायांकित प्रत. | |

## विवेचन

हुतात्मा किसन अहिर साखर कारखाना लि.,वाळवे, ता.वाळवा, जि.सांगली यांच्याकडील कामगारांना दिलेल्या बोनस संदर्भातील सहाय्यक कामगार आयुक्त कार्यालयाने केलेली तपासणी, संबंधित विवरणपत्र आदींची माहिती आपण मागितली होती. परंतु सन १९९८ ते २००६ या काळात बोनस अधिनियम १९६५ चे नियम ४, ५ व २७ प्रमाणे कायदेशीर कागदपत्र ठेवल्याबाबत तपासणी केलेली नाही व अधिकाऱ्यांनी कारखान्याला भेट दिलेली नाही, त्यामुळे माहिती देता येत नाही, असे जन माहिती अधिकारी तथा सरकारी कामगार अधिकारी, सहाय्यक कामगार आयुक्त यांचे कार्यालय, सांगली यांनी कळविले. आपल्या कार्यालयाकडे ही माहिती उपलब्ध नसल्याचे जन माहिती अधिकाऱ्यांनी दिलेले उत्तर योग्य ठरवून अपिलीय प्राधिकारी तथा सहाय्यक कामगार आयुक्त, सहाय्यक कामगार आयुक्त यांचे कार्यालय, सांगली यांनी अपील निकाली काढले. कामगारविषयक कायद्याप्रमाणे बंधनकारक असलेली, आपण मागितलेली माहिती दिली जात नाही. आठ वर्षांत कारखान्याला अधिकाऱ्यांनी भेट दिलेली नाही, त्याची नोंदवही नाही, कारखान्याने कायदेशीररीत्या बंधनकारक असलेली माहिती पाठविली नाही, तरीही कारवाई केली

जात नाही. याबाबत संबंधितांना समन्स काढून चौकशी करावी व त्यांच्यावर कारवाई व्हावी, अशी मागणी अपीलकर्ता श्री.कृष्णा विश्वनाथ जंगम यांनी लेखी व तोंडी केली.

कारखान्याने कामगारांना बोनस दिल्याबद्दल फॉर्म डी चे व फॉर्म सी नियम ४ सी प्रमाणे वार्षिक विवरणपत्र व्यवस्थापनाने सादर केलेले नाहीत. त्यामुळे श्री.जंगम यांना देता आलेले नाहीत. तसेच नियम ४ अन्वये ए,बी,सी प्रपत्र ठेवण्याबाबत व नियम ५ अन्वये बोनसचे वार्षिक विवरणपत्र पाठविण्याबाबत व्यवस्थापनाने वार्षिक विवरणपत्र बोनस अदा केल्यापासून ३० दिवसांच्या आत पाठविणे आवश्यक असते, कारखान्याने ते पाठविलेले नाही व याबाबत निरीक्षकाने निरीक्षण केलेले नाही. त्यामुळे माहिती देता आली नाही, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी श्री.तु.सा.टेके यांनी केले.

सन १९९८ पासूनची माहिती श्री.जंगम यांनी मागितली आहे. आठ वर्षांत तत्कालीन कामगार अधिकाऱ्यांनी बोनसबाबतची तपासणी केलेली नाही व कारखान्याला भेट दिलेली नाही हे चूक आहे, हे मान्य आहे. परंतु या वस्तुस्थितीमुळे माहिती देता आलेली नाही, असे निवेदन अपिलीय प्राधिकारी श्री.अ.आ.भिसे यांनी केले.

तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री.एन.डी.माळी व अपिलीय प्राधिकारी श्री.सु.बा.बागल यांनी तांत्रिकदृट्या विहित मुदतीत उत्तर दिले आहे. परंतु आवश्यक माहितीची पूर्तता करण्याच्या दृष्टीने त्यांनी तत्परता दर्शविलेली नाही. कायदेशीरदृष्ट्या ठेवणे व सार्वजनिक स्वरुपात उपलब्ध असणे बंधनकारक असलेली माहिती ठेवली जात नाही व त्याबाबत अधिकारी दखल घेत नाहीत, असे चित्र त्यातून स्पष्ट होते. तत्कालीन अधिकाऱ्यांकडून याबाबतचा खुलासा प्राप्त करुन घेऊन दोन महिन्यांत परिपूर्ण माहिती अपीलकर्त्यास द्यावी व आयोगाला अहवाल सादर करावा, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले.

आयोगाच्या आदेशानुसार जन माहिती अधिकारी तथा सरकारी कामगार अधिकारी, सहाय्यक कामगार आयुक्त यांचे कार्यालय, सांगली श्री.तु.सा.टेके यांनी दि.१५.१०.२००८ रोजी आयोगाला अहवाल सादर करुन त्याची प्रत अपीलकर्त्यास पुरविली. 'दि.१७.९.२००८ रोजी

संदर्भित साखर कारखान्यास बोनस प्रदान अधिनियम १९६५ अंतर्गत भेट देऊन निरीक्षणशेरे पारित केले. बोनस प्रदान अधिनियम १९६५ व बोनस प्रदान अधिनियम १९७५ नियम ५ अन्वये मार्च २००० ते मार्च २००८ अखेरचे बोनसचे वार्षिक विवरणपत्र कारखान्याकडून प्राप्त करुन घेऊन त्याच्या छायांकित प्रती सादर करण्यात येत आहेत. बोनस अधिनियम १९६५ चे कलम २६ व नियम ४ सी अन्वये व्यवस्थापनाने प्रत्येक कामगाराला देय असलेली बोनसची रक्कम, त्यातून करावयाची कपात आणि प्रत्यक्ष वाटप केलेली रक्कम यांचा तपशील दर्शविणारे प्रपत्र नमुना-सी हे व्यवस्थापनाने ठेवलेले आहे, त्याचे विवरणपत्र (रिटर्न) नसते. ही माहिती अपीलकर्त्यास पाठविण्यात येत आहे. अपूर्ण राहिलेल्या बाबींची पूर्तता करण्याचे कारखान्याने दि.१५.१०.२००८ च्या पत्रान्वये लेखी दिले आहे,' असे जन माहिती अधिकारी श्री.तु.सा.टेके यांनी या अहवालात नमूद केले आहे.

आठ वर्षांत या कागदपत्रांबाबत सहाय्यक कामगार आयुक्त कार्यालयाने व संबंधित अधिकाऱ्यांनी जबाबदारी पार पाडलेली नव्हती, असे या अहवालातून स्पष्ट होते.

माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ दि.१२.१०.२००५ रोजी अस्तित्वात आला. तयातील कलम ४ नुसार सार्वजनिक प्राधिकरणांनी स्वयंस्फूर्तीने १७ मुद्दयांची माहिती जाहीर करावयाची आहे. परंतु सन १९९८ पासून त्याची अंमलबजावणी (पूर्वलक्षी पध्दतीने) व्हावी, व ती न केल्याबद्दल संबंधितांवर कारवाई करावी, अशी मागणी अपीलकर्ते श्री.कृष्णा विश्वनाथ जंगम करीत आहेत. ती रास्त नाही. कायदा अस्तित्वात येण्यापूर्वीपासून अंमलबजावणीची अपेक्षा अतिशयोक्तीची व निराधार आहे. तसेच कामगारविषयक कायद्यांची पूर्तता कारखान्याने केली की नाही व ती केली नसल्यास त्यांच्यावर व ती करवून न घेणाऱ्या अधिकाऱ्यांवर कारवाई करावी, ही प्रशासकीय कार्यवाहीची मागणी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत येत नाही. माहितीच्या संदर्भातील कार्यवाहीचीच या कायद्यान्वये दखल घेणे आवश्यक आहे.

कारखान्याने बव्हंश माहिती त्वरित उपलब्ध करुन दिली आहे, याचा अर्थ ती माहिती कारखान्याकडे तयार होती. आपल्या कार्यालयाकडे ही माहिती उपलब्ध नसल्याचे अपीलकर्त्याला

कळविण्यापूर्वी तत्कालीन जन माहिती अधिकाऱ्यांना ती कारखान्याकडून मागवून घेता आली असती व अपीलकर्त्याला देता आली असती. या कागदपत्रांबाबत पूर्तता करुन घेणे हा कामगारविषयक नियमानुसारच्या कर्तव्याचा भाग आहे, तसेच माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अन्वयेही जन माहिती अधिकाऱ्यांनी ते करणे आवश्यक होते. त्या त्या वेळच्या सहाय्यक कामगार आयुक्तांनी याची दखल घ्यावयास हवी होती व तत्कालीन अपिलीय प्राधिकारी तथा सहाय्यक कामगार आयुक्त श्री.सु.बा.बागल यांनी अपील निकाली काढण्यापूर्वी केवळ जन माहिती अधिकाऱ्यांच्या तांत्रिक उत्तराची पाठराखण करण्याऐवजी माहिती उपलब्ध करुन देण्याचे आदेश देऊन त्यानुसार पूर्तता करुन घेणे आवश्यक होते. या बाबी लक्षात घेता, तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री.एन.डी.माळी व अपिलीय प्राधिकारी श्री.सु.बा.बागल यांनी आपली जबाबदारी पार पाडलेली नाही. परिणामी, जी माहिती तीस दिवसांच्या विहित मुदतीत देता आली असती ती अपीलकर्त्याला दोन वर्षांनी दिली गेली आहे, हे स्पष्ट होते. त्यामुळे ते शास्ती व अनुषंगिक कारवाईस पात्र ठरतात.

उभय बाजूंची निवेदने व कागदपत्रे पाहता आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

(१) अपील मान्य करण्यात येत आहे.

(२) तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा सरकारी कामगार अधिकारी, सहाय्यक कामगार आयुक्त यांचे कार्यालय, सांगली श्री.एन.डी.माळी यांनी विहित मुदतीत उत्तर देण्याची तांत्रिकता पूर्ण केली आहे. परंतु माहिती देण्याबाबत तत्परता दर्शविण्याऐवजी अप्रत्यक्षरीत्या ती नाकारली आहे. याबद्दल त्यांना रु.२५००० शास्ती करण्यात येत आहे. त्यांना नोव्हेंबर २००९ व डिसेंबर आणि जानेवार २०१० मध्ये त्यांना मिळणाऱ्या वेतनातून शास्तीची रक्कम तीन हप्त्यांत वसूल करुन ती '००७, इतर प्रशासकीय सेवा, ६०, इतर सेवा, ८००, इतर जमा रकमा, (१८) माहितीचा अधिकार (००७००१६१)' या लेखाशिर्षाखाली जमा करण्याची कार्यवाही श्री.अ.आ.भिसे,

सहाय्यक कामगार आयुक्त, सांगली यांनी करुन, तसेच याबाबत संबंधितांच्या सेवापुस्तकात व गापेनीय अहवालात याच्या नोंदी घेऊन त्याचा अहवाल आयोगाला सादर करावा.

(३) तत्कालीन अपिलीय प्राधिकारी तथा सहाय्यक कमगार आयुक्त, सांगली श्री.सु.बा.बागल यांनी जन माहिती अधिकाऱ्यांची कृती योग्य ठरवली व माहिती उपलब्ध करुन देण्यासाठी आवश्यक कृती केली नाही, याबद्दल त्यांना ताकीद देण्यात येत आहे. त्याची नोंद त्यांच्या सेवापुस्तकात व गोपनीय अहवालात घेण्यात यावी.

(४) नियमानुसार ठेवणे बंधनकारक असलेली व माहितीचा अधिकार अधिनियम, २००५च्या कलम ४ अन्वये नागरिकांसाठी उपलब्ध असणे आवश्यक असलेली माहिती ठेवण्याबाबत सहाय्यक कामगार आयुक्तालय, सांगली यांच्या कार्यालयाने योग्य जबाबदारी पार पाडलेली नाही, त्याला जबाबदार असणाऱ्या अधिकाऱ्यांबाबत, कामगार आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी चौकशी करुन नियमानुसार कडक कारवाई करावी व त्याचा अहवाल दि.१५.११.२००९ पर्यंत आयोगाला सादर करावा.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र
पुणे खंडपीठ

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. २१ .१०.२००९**

प्रत::कामगार आयुक्त, कॉमर्स सेंटर, ताडदेव, सहावा व सातवा मजला, मुंबई यांना कार्यवाहीसाठी.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.विजय केशव लेले
सावरकर चौक, विद्यामंदिर प्रशालेजवळ, मिरज, जि.सांगली — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा आयुक्त, सांगली मिरज कुपवाड शहर,
महानगरपालिका, सांगली, जि.सांगली — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा सहाय्यक आयुक्त,
सांगली मिरज कुपवाड शहर, महानगरपालिका, सांगली, जि.सांगली

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २७९ /सांगली / |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२९.८.२००८ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.विजय केशव लेले
सावरकर चौक, विद्यामंदिर प्रशालेजवळ, मिरज, जि.सांगली

**अपिलीय प्राधिकारी** तथा आयुक्त, सांगली, मिरज, कुपवाड शहर,
महानगरपालिका, सांगली, जि.सांगली श्री.एस.टी.रसाळे
**जन माहिती अधिकारी** तथा सहाय्यक आयुक्त,
सांगली, मिरज, कुपवाड शहर, महानगरपालिका, सांगली, जि.सांगली

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २६.२.२००७ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. २८.३.२००७ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. ७.४.२००७ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. १७.४.२००७ |
| ८ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**<br><br>माहिती-मागणीच्या मूळ अर्जाची प्रत (जोडपत्र-अ) सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

मिरज शहरातील इतिहासप्रसिध्द बंकाचा दरवाजा व किल्ला भागाच्या पिछाडीला असलेली तटभिंत व बुरुज पाडण्याच्या संदर्भातील माहिती सत्य व पूर्ण दिली जात नाही. 'बांधकाम पाडण्याची कार्यवाही आयुक्तांच्या मौखिक आदेशाने केली,' असे उत्तर जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त, सांगली, मिरज, कुपवाड शहर महानगरपालिका यांनी दिले व जागेची मालकी महापालिकेची असल्याचे चुकीचे उत्तर दिले. व अपिलीय प्राधिकाऱ्यांनीही संबंधित जागेच्या मालकीच्या अनुषंगाने नेमकी कार्यवाही केली नाही. श्रीमंत युवराज माधवराव नारायणराव ऊर्फ रावसाहेब पटवर्धन व आपले वडिल केशव मोरेश्वर लेले यांची मालकी असल्याचे पुरावे जोडूनही नुकसानभरपाई दिलेली नाही, असे प्रतिपादन अपीलकर्ता श्री.विजय केशव लेले यांनी केले.

श्री.लेले यांना माहिती दिली होती. संबंधित दरवाजा हा रस्त्याचाच भाग असल्यामुळे, तो पाडला असून नुकसानभरपाईचा प्रश्न येत नाही. माहिती मिळाल्याचे श्री.लेले यांनी प्रथम अपिलाच्या सुनावणीत मान्य केले आहे. तसे अपिलीय प्राधिकाऱ्यांच्या निकालपत्रात नमूद आहे. काही माहिती शहर अभियंता यांच्याकडून प्राप्त होण्यास विलंब लागला, त्यामुळे ती नंतर देण्यात आली, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी श्री.एस.टी.रसाळे यांनी केले.

अपीलकर्ता यांना प्रामुख्याने नुकसानभरपाईच्या अनुषंगाने जन माहिती अधिकाऱ्यांनी माहिती दिली आहे. जागेच्या मालकीबाबत नेमकी माहिती दिलेली नाही. तसेच ऐतिहासिक दरवाजा पाडण्यासाठी पुरातत्त्व खात्याची परवानगी घेतली होती का, हेही स्पष्ट होत नाही. या अनुषंगाने

स्पष्टीकरणात्मक माहिती व कागदपत्रांच्या प्रती श्री.लेले यांना निःशुल्क द्याव्यात व अनुपालन अहवाल १५ दिवसात आयोगाला सादर करावा, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले. त्यानुसार दि.४.९.२००८ च्या पत्रान्वये जागेच्या मालकी हक्काच्या उताऱ्यांच्या प्रती व अन्य माहिती श्री.लेले यांना दिली. तसेच त्यावेळी झालेल्या चर्चेच्या अनुषंगाने आणखी काही माहिती दि.३.१०.२००८ रोजी दिली , असे जन माहिती अधिकारी श्री.एस.टी.रसाळे यांनी आयोगास माहितीच्या प्रतींसह अवगत केले.

उभय बाजूंनी सादर केलेली निवेदने व कागदपत्रे पाहता आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि. २७.१०.२००९

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे -१

ॲड. विकास जोशी
साई सदन, प्लॅट नं.२९, चौथा मजला,
पुण्याई नगर, धनकवडी,
पुणे ४११ ०४३

**अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा उपसंचालक,
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी-१८

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी** तथा नगररचनाकार,
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी-१८

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २८०६/ पुणे |
| २ | विशेष अपील निर्गत कार्यक्रम तारीख | दि.२५.०२.२००९ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** - ॲड. विकास जोशी
साई सदन, प्लॅट नं.२९, चौथा मजला, गैरहजर
पुण्याई नगर, धनकवडी, पुणे ४११ ०४३

**अपिलीय प्राधिकारी** तथा उपसंचालक,
पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी-१८ श्री.अविनाश भालचंद्र पाटील

**जन माहिती अधिकारी** तथा नगररचनाकार,
पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी-१८ श्री.पी.बी.शिंपी

४ **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**

पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेने दि.१६.०६.२००५ च्या पत्रात नमूद केल्याप्रमाणे स्मशानभूमीसाठी नियोजन प्रमाणकाची प्रत

## विवेचन

पिंपरी चिंचवड शहरातील स्मशानभूमीबाबत महानगरपालिका आयुक्तांच्या दि.१६.०६.२००५ च्या पत्रात नमूद केलेल्या नियोजन प्रमाणकाची प्रत आपल्याला मिळाली नसल्याच्या कारणास्तव ॲड. विकास जोशी यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे.

अपिलीय प्राधिकारी तथा उपसंचालक, पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी, यांच्या कडील सुनावणीला, तसेच आयोगाने दि.२५.०२.२००९ रोजी केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'लाही अपीलकर्ता ॲड.विकास जोशी उपस्थित नव्हते.

ॲड.विकास जोशी यांना विहित मुदतीत शुल्क कळविण्यात आले. त्यांचे प्रतिनिधी श्री.अनंत गावडे यांनी शुल्क भरल्यानंतर नियोजन प्रमाणकाची प्रत व्यक्तिशः देण्यात आली. आपल्याला ही प्रत मिळाल्याचे ॲड.विकास जोशी यांनी अपील अर्जात स्वतः नमूद केले आहे, असे लेखी व तोंडी प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा नगररचनाकार, पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी श्री.पी.बी.शिंपी व अपिलीय प्राधिकारी तथा उपसंचालक, पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी श्री. अविनाश भालचंद्र पाटील यांनी पूरक कागदपत्रांसह केले. माहिती मिळालेली असताना न मिळाल्याची तक्रार करुन अपील करण्याची अपीलकर्ता ॲड.विकास जोशी यांची कृती योग्य नाही. अशा प्रकारे सर्व यंत्रणांच्या वेळ व शक्तीचा अपव्यय करु नये, अशी समज अपीलकर्त्यास समज देण्यात येत आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

पुणे
**दिनांक : १५ / १०/२००९**

**( विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त**
**पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.मनजितसिंग विर्दी
१२ /७, नवजीवन सोसायटी, मोरी रोड, माहीम, मुंबई-१६ अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा अप्पर पोलीस अधीक्षक,
पुणे ग्रामीण पोलीस कार्यालय, पाषाण, पुणे-८ उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा उपविभागीय पोलीस अधिकारी,
लोणावळा विभाग, लोणावळा, जि.पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २८२४/ पुणे २००९ |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १५.७.२००९ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.मनजितसिंग विर्दी
१२/७, नवजीवन सोसायटी, मोरी रोड, माहीम, मुंबई-१६

**अपिलीय प्राधिकारी** तथा अप्पर पोलीस अधीक्षक,
पुणे ग्रामीण पोलीस कार्यालय, पाषाण, पुणे-८ श्री.अशोक मोराळे

**जन माहिती अधिकारी** तथा उपविभागीय पोलीस अधिकारी,
लोणावळा विभाग, लोणावळा, जि.पुणे श्री.अे.अे.शिंदे

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १५.१०.२००८ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. १२.१०.२००८ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. १०.१२.२००८ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. ३०.१२.२००८ |
| ८ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**<br><br>सोबत प्रत जोडली आहे. | |

## विवेचन

आपल्या भावाच्या खुनाला तीन वर्षे होऊन गेली तरी तपासाबाबतची पूर्ण माहिती पोलीस आपल्याला देत नाहीत. तपास चालू असल्याच्या कारणावरुन व काही माहिती उपलब्ध नसल्याचे नमूद करुन जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय पोलीस अधिकारी, लोणावळा विभाग, लोणावळा, जि.पुणे व अपिलीय प्राधिकारी तथा अप्पर पोलीस अधीक्षक, पुणे ग्रामीण पोलीस कार्यालय, पाषाण माहिती नाकारत आहेत. आपले बंधू कॅप्टन मनमोहनसिंग विर्दी यांचा दि.१४.५.२००६ रोजी खून झाला. तीन वर्षे उलटून गेली तरी सर्व संशयितांना पकडणे, त्यांचे जाबजबाब घेणे याबाबतची कार्यवाही समाधानकारकरीत्या झालेली नाही. तपासाबाबत आपण विविध मुद्दे नोंदविले असून त्याकडे लक्ष दिले जात नाही. ते दिल्यास या गंभीर गुन्ह्याचा तपास वेगाने लागू शकेल. खुनासारख्या आरोपातील गुन्हेगार मोकाट सुटतात, हे सार्वजनिक हिताच्या दृष्टीनेही योग्य नाही, म्हणून आपल्याला माहिती मिळाली पाहिजे, असे प्रतिपादन अपीलकर्ता श्री.मनजितसिंग विर्दी यांनी केले.

या प्रकरणात तपास चालू असून श्री. विर्दी यांना वेळोवेळी माहिती देण्यात आली आहे. दिलेली माहिती योग्य आहे, असे जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय पोलीस धिकारी

लोणावळा विभाग, लोणावळा, जि.पुणे श्री.अ.अ.शिंदे यांनी नमूद केले. तपास चालू असल्यामुळे जन माहिती अधिकाऱ्यांनी माहिती दिली नाही व अपिलामध्ये ते ग्राह्य धरण्यात आले आहे. संबंधित प्रकरणात दोन आरोपींना अटक केलेली आहे. दोन आरोपी दुबई येथे राहणारे आहेत. जिल्हा पोलीस अधीक्षकांच्या देखरेखीखाली चौकशी केली जाते. दोषारोपपत्र पाठविण्याची कार्यवाही लवकरच करण्यात येत आहे, असे प्रतिपादन अपिलीय प्राधिकारी तथा अप्पर पोलीस अधीक्षक, पुणे ग्रामीण, पुणे श्री.अशोक मोराळे यांनी केले.

श्री.विर्दी यांना जन माहिती अधिकाऱ्यांनी दि.३.१२.२००८ रोजी उत्तर पाठविले, त्यावर तारीख मात्र दि.१२.११.२००८ घातली आहे. स्पष्टीकरण, खुलासे अशी माहिती काही मुद्दयांमध्ये श्री.विर्दी यांनी मागितली आहे, माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अन्वये अशा प्रकारची विचारणा करता येत नाही. मात्र एखाद्या गुन्ह्याचा तपास तीन-तीन वर्षे चाललेला आहे आणि संबंधितांना त्याबाबत नेमकेपणाने काही सांगितले जात नाही, हे योग्य नाही. सर्व तपशील उघड असताना तपासावर परिणाम होण्याच्या शक्यतेचे कारण दाखवून माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम ८(१)(एच) खाली माहिती नाकारणे योग्य नाही. तपास नेमका कशा प्रकारे चालला आहे, हे जाणून घेण्याचा अपीलकर्त्याचा अधिकार आहे, त्यामुळे तपासाबाबतच्या सद्यस्थितीची नेमकी माहिती, जन माहिती अधिकारी / अपिलीय प्राधिकारी यांनी श्री.विर्दी यांना एक आठवड्यात द्यावी असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले. त्यानुसार तत्कालीन अपिलीय प्राधिकारी तथा अप्पर पोलीस अधीक्षक, पुणे ग्रामीण पोलीस कार्यालय, पाषाण श्री.अशोक मोराळे यांनी दि.२८.७.२००९ च्या पत्रान्वये श्री.विर्दी यांना मुद्देनिहाय उत्तर दिले. परंतु आपल्या मुद्दयांचे स्पष्टीकरण त्यात नाही, अशी तक्रार श्री.विर्दी यांनी केली. श्री.मोराळे यांनी दिलेल्या उत्तरात अनेक मुद्दयांवर 'शोध घेत आहोत' अशा आशयाचे उत्तर दिले आहे. तसेच दोषारोपपत्र नेमके कधी दाखल केले जाईल याचा स्पष्ट उल्लेख नाही. ते लक्षात घेता व श्री.विर्दी यांनी तपासाबाबत उपस्थित केलेल्या मुद्दयांच्या अनुषंगाने स्पष्टीकरणात्मक अशी माहिती नेमकेपणाने दिली जाणे आवश्यक आहे. मात्र तपासाबाबतचे त्यांचे आक्षेप व त्यांनी केलेल्या

सूचना याची दखल घेण्याची मागणी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत विचारात घेता येणार नाही.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

(१) अपील अंशतः मान्य.

(२) कॅप्टन विर्दी यांच्या खुनाच्या तपासाबाबत अपीलकर्ता श्री.मनजितसिंग विर्दी यांनी उपस्थित केलेल्या मुद्दयांच्या अनुषंगाने नेमक्या स्वरुपातील स्पष्टीकरणात्मक माहिती विषयांकित प्रकरणी दोषारोपपत्र दाखल करण्याबाबतच्या नेमक्या कालावधीच्या उल्लेखासह दि.५.११.२००९ पर्यंत विद्यमान अपिलीय प्राधिकारी तथा अप्पर पोलीस अधीक्षक, पुणे ग्रामीण पोलीस कार्यालय, पाषाण यांनी द्यावी व अनुपालन अहवाल आयोगाला सादर करावा.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. २२ .१०.२००९**

**राज्य माहिती आयुक्त, पुणे विभाग, पुणे राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
विधान भवन समोर, पुणे १

श्रीमती ज्योती गणपतराव जाधव
रा.गोकर्ण कॉलनी, संगमनगर, सातारा — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा समाज कल्याण अधिकारी
गट-अ, सातारा जिल्हा परिषद, जि. सातारा — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा मुख्याध्यापक,
मूक बधीर विद्यालय, मल्हार पेठ, सातारा

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २८६+ ३११ / सातारा |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २१.८.२००८ |

३. **उपस्थित**

**अपीलकर्ता -** श्रीमती ज्योती गणपतराव जाधव
रा.गोकर्ण कॉलनी, संगमनगर, सातारा

**अपिलीय प्राधिकारी** तथा समाज कल्याण अधिकारी
गट-अ, सातारा जिल्हा परिषद, जि. सातारा तर्फे प्रतिधिनी श्री. के.टी.शिंदे

**जन माहिती अधिकारी** तथा मुख्याध्यापक,
मूक बधीर विद्यालय, मल्हार पेठ, सातारा
श्रीमती अलका रामचंद्र खामकर

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २४.९.२००७ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. २३.१०.२००७ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. २५.१०.२००७ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. २३.११.२००७ |

८ **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**

सोबत छायांकित प्रत जोडली आहे.

## विवेचन

समता शिक्षण प्रसारक मंडळ, सातारा या संस्थ्येच्या मूकबधीर विद्यालयाच्या संदर्भातील माहिती श्रीमती ज्योती गणपतराव जाधव व श्री. संजय दामोदर मोहिते या अपीलकर्त्यांनी मागितली होती. जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, मूकबधीर विद्यालय, सातारा यांनी काही माहिती दिली. परंतु अन्य मुद्दयांची माहिती चुकीची, अपूर्ण व दिशाभूल करणारी मिळाल्याच्या कारणावरुन श्रीमती जाधव व श्री. मोहिते यांनी अपिलीय प्राधिकारी तथा समाजकल्याण अधिकारी, गट-अ, जिल्हा परिषद, सातारा यांच्याकडे अपील केले. पंधरा दिवसांत नि:शुल्क माहिती देण्याचा आदेश अपिलीय प्राधिकाऱ्यांनी दिला. त्यानंतरही माहिती मिळाली नाही, असे प्रतिपादन श्रीमती जाधव व श्री. मोहिते यांनी केले.

श्री. मोहिते व श्रीमती जाधव हे पती-पत्नी असून त्यांनी विस्तृत माहिती मागितली होती. त्यावेळी नियुक्त केलेल्या मुख्याध्यापक पदाला शासनाची मंजुरी नव्हती, त्यामुळे त्यांना जन माहिती अधिकारी म्हणून काम पाहता येईल का, हे स्पष्ट नव्हते. त्यामुळे शासनाकडून योग्य आदेश आल्यानंतर माहिती देण्यात येईल, असे श्री. मोहिते व श्रीमती जाधव यांना कळविले. तसेच उपलब्ध असलेली माहिती दिली. अपिलीय प्राधिकारी तथा समाजकल्याण अधिकारी, गट-अ, जिल्हा परिषद, सातारा यांच्या निर्णयानंतर काही माहिती दिली. मात्र मूकबधीर विद्यालयात त्या काळात सुमारे १२५ विद्यार्थी शिक्षण घेत होते. त्यातील साठ विद्यार्थ्यांबाबत कर्मचारी-अनुदान मिळते. ऊर्वरित ६० विद्यार्थ्यांसाठी कोणतेही अनुदान मिळत नाही. त्यामुळे त्यांचा व वसतीगृहातील २५ मुलांचा खर्च भागविणे विद्यालयास कठीण जात आहे. या स्थितीत अपीलकर्त्याने मागितलेली विस्तृत माहिती देण्यास कागदपत्रांच्या छायांकित प्रती काढण्याकरिता सुमारे १० ते १५ हजार रुपये खर्च येईल. हा खर्च विद्यालयाला करता येणार नाही. श्रीमती जाधव आमच्या विद्यालयातच उपशिक्षिका असून श्री. मोहिते कनिष्ठ महाविद्यालयात प्राध्यापक आहेत. संस्थेच्या परिस्थितीची त्यांना कल्पना आहे. त्यांनी शुल्क भरल्यास माहिती देण्याची तयारी आहे,

असे विद्यालयाचे प्रमुख व तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक श्री. पार्थ परिप्पा पोळके यांनी नमूद केले.

सन १९९२ पासून संबंधित मुख्याध्यापक कार्यरत असून दि. २६.७.२००७ पासून सर्व प्रभारी मुख्याध्यापक जन माहिती अधिकारी झाले आहेत, असे अपिलीय प्राधिकारी यांनी स्पष्ट केले आहे.

उभय बाजूंची निवेदने व सादर करण्यात आलेली कागदपत्रे पाहता श्री. मोहिते व श्रीमती जाधव यांनी मागितलेली माहिती विस्तृत आहे व जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक यांनी माहिती नाकारलेली नाही. श्री. पोळके यांनी लेखी व तोंडी नमूद केलेली विद्यालयाची आर्थिक स्थिती लक्षात घेता, संपूर्ण माहिती नि:शुल्क देता येणार नाही, हे प्रतिपादन मान्य करण्यात येत आहे. मात्र झालेला विलंब लक्षात घेता १०० पानांपर्यंतची माहिती नि:शुल्क व ऊर्वरित माहिती योग्य शुल्क आकारुन जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक श्रीमती अलका रामचंद्र खामकर यांनी अपिलीय प्राधिकारी तथा समाज कल्याण अधिकारी श्री. ए. पी. कांबळे यांच्या उपस्थितीत अपीलकर्त्यांना द्यावी, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले. त्यानुसार समाजकल्याण अधिकारी यांनी दि. १६.९.२००८, दि.१७.९.२००८ व दि. २०.९.२००८ रोजी शाळेत उपस्थित राहून अपीलकर्त्यांना माहिती प्राप्त करुन दिली, असा अपीलकर्त्यांची पोहच असलेल्या पत्रासह अहवाल समाजकल्याण अधिकारी (गट-अ), जिल्हा परिषद, सातारा श्री. ए.पी.कांबळे यांनी दि.२४.९.२००८ च्या पत्रान्वये आयोगाला सादर केला.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपिले निकाली काढण्यात येत आहेत.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. २१ .१०.२००९**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.दिलीप दिगंबर नवगिरे
१३/३, एल.आय.जी.कॉलनी, प्राधिकरण निगडी, पुणे — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा सहाय्यक पोलीस आयुक्त,
पिंपरी विभाग, पुणे शहर, पिंपरी — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा पोलीस निरीक्षक,
निगडी पोलीस स्टेशन, पुणे शहर, पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २८६० / पुणे / २००९ |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ४ . ४ .२००९ |
| **३.** | **उपस्थित** | |

**अपीलकर्ता** श्री.दिलीप दिगंबर नवगिरे
१३/३, एल.आय.जी.कॉलनी, प्राधिकरण निगडी, पुणे

**अपिलीय प्राधिकारी** तथा सहाय्यक पोलीस आयुक्त,
पिंपरी विभाग, पुणे शहर, पिंपरी श्री.पी.ए.पाटील

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.१६.९.२००८ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. १६.१०.२००८ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. १३.११.२००८ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. १५.११.२००८ |
| ८ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**<br>सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.४.४.२००९ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. उभय घटकांत एकमत न झाल्यामुळे अपिलाची सुनावणी घेण्यात आली.

अतिक्रमणामुळे होणाऱ्या त्रासाच्या संदर्भात दिलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने अपीलकर्ता श्री.दिलीप दिगंबर नवगिरे यांनी जन माहिती अधिकारी तथा पोलीस निरीक्षक, निगडी पोलीस स्टेशन, पुणे शहर यांच्याकडे माहिती मागितली होती. माहिती मिळाली नाही व अपिलीय प्राधिकाऱ्यांनी अपील निकाली काढले, म्हणून श्री.नवगिरे यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे.

श्री.नवगिरे यांना त्यांच्या तक्रारीवरील चौकशीबाबतची सर्व माहिती देण्यात आली. मात्र त्या काळात राष्ट्रकुल युवा स्पर्धेच्या संदर्भातील बंदोबस्तातील कामांमुळे श्री.नवगिरे यांना काही माहिती देण्यास विलंब झाला, असे अपिलीय प्राधिकारी श्री.पी.ए.पाटील यांनी नमूद केले. पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकारणाने श्री.नवगिरे यांच्या तक्रारीबाबत पोलिसांकडे पाठविलेल्या पत्राची प्रत श्री.नवगिरे यांना त्वरित द्यावी, असे आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले. त्यानुसार त्याचदिवशी ही प्रत देऊन श्री.नवगिरे यांची पोहोच असलेली प्रत सहाय्यक पोलिस निरीक्षक, निगडी पोलिस स्टेशन यांनी आयोगाला सादर केली.

उभय बाजूंनी सादर केलेली निवेदने व कागदपत्रे पाहता आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. ८.१०.२००९**

**राज्य माहिती आयुक्त, पुणे विभाग, पुणे राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
विधान भवन समोर, पुणे १

श्री. जावेद दुलेखान आतार
प्लॉट नं.ए-१६, एम.आय.डी.सी. कोरेगाव, जि.सातारा — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा जिल्हा पोलीस अधीक्षक,
करवीर विभाग, जि. कोल्हापूर — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा उप विभागीय पोलीस अधिकारी,
करवीर उपविभाग, जि. कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २८७ / सातारा |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २२.८.२००८ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता -** श्री. जावेद दुलेखान आतार
प्लॉट नं.ए-१६, एम.आय.डी.सी. कोरेगाव, जि.सातारा

**जन माहिती अधिकारी** तथा उप विभागीय पोलीस अधिकारी,
करवीर उपविभाग, जि. कोल्हापूर श्री. बी. एस. तांगडे

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ३.७.२००७ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. -- |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. १६.८.२००७ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. ५.९.२००७ |

८ **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**

गुन्हा रजिस्टर नं.२४/२००७ चे एफ.आय.आर.ची प्रत, पंचनामा मेमो, जप्ती मेमो, अटक मेमो, तपास मेमो, व चार्जशीट मेमो च्या प्रती

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.२२.८.२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश करण्यात आलेला होता. त्यावेळी उभय घटकांमध्ये एकमत न झाल्याने दि. २२.८.२००८ रोजी अपिलाची सुनावणी घेण्यात आली.

मिर्ची पावडर, फरसाण इ. तयार करण्याचा आपला व्यवसाय असून आपले व्यापारी चिन्ह व संस्थेचे नाव वापरुन फरसाण मालाची बेकायदेशीर विक्री होत असल्याचे आढळल्यामुळे आपण गांधीनगर, जि. कोल्हापूर येथील पोलिसांकडे गुन्हा नोंदविला. त्याबाबतची माहिती जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय पोलीस अधिकारी, करवीर, जि.कोल्हापूर यांनी आपल्याला दिली नाही. म्हणून आपण अपिलीय प्राधिकारी तथा पोलीस अधीक्षक, कोल्हापूर यांच्याकडे अपील केले. परंतु त्यांनी आपल्याला शिवीगाळ केली व आपल्या विरुध्दच कारवाई करण्याची धमकी दिली, असे लेखी व तोंडी प्रतिपादन अपीलकर्ता श्री. जावेद दुलेखान आतार यांनी केले.

श्री. आतार यांनी माहिती मागितली तेव्हा गुन्ह्याचा तपास चालू असल्यामुळे चार्जशिट मेमोची नक्कल दिली नाही. बाकी सर्व माहिती दिली. तत्कालीन अपिलीय प्राधिकारी तथा जिल्हा पोलीस अधीक्षक श्री.सुखविंदरसिंह यांनी श्री. आत्तार यांना शिवीगाळ केली नाही. मात्र श्री. आतार यांनी दिलेली फिर्याद खोटी असल्याचे व त्यांच्या नावे व्यापार परवाना नसल्याचे निष्पन्न झाल्यावर त्यांच्या विरुध्द कारवाई करण्यात येणार असल्याची कल्पना दिली. अशा प्रकारची कारवाई पोलिसांनी करु नये, या एकमेव उद्देशाने श्री. आतार असे आरोप करीत आहेत, असे लेखी व तोंडी प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय पोलीस अधिकारी, करवीर, जि.कोल्हापूर श्री. बी. एस. तांगडे यांनी केले. दोषारोपपत्र न्यायालयात दाखल केले नसल्यामुळे त्यावेळी प्रत देण्यात आली नव्हती. परंतु दि.६.११.२००७ रोजी तपास पूर्ण झाला असून न्यायालयात दाखल झालेल्या दोषारोपपत्राची प्रत देण्यात आली आहे, असेही त्यांनी नमूद केले. श्री. तांगडे यांचे हे निवेदन मान्य करण्यात येत आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि. २२.१०.२००९

**राज्य माहिती आयुक्त, पुणे विभाग, पुणे राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
विधान भवन समोर, पुणे १

श्री. नंदकुमार वसंत खाडे
रा.जठारवाडी, ता. करवीर, जि.कोल्हापूर
अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था,
कोल्हापूर, जि. कोल्हापूर

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा सचिव, श्री केदारलिंग
सहकारी दूध व्यावसायिक संस्था मर्या., जठारवाडी,
ता. करवीर, जि. कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ३०० / कोल्हापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १८.१२.२००८ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता -** श्री. नंदकुमार वसंत खाडे
रा.जठारवाडी, ता. करवीर, जि.कोल्हापूर

**अपिलीय प्राधिकारी** तथा सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था,
कोल्हापूर, जि. कोल्हापूर श्री. मोहन चांगदेव निंबाळकर

**जन माहिती अधिकारी** तथा सचिव, श्री केदारलिंग
सहकारी दूध व्यावसायिक संस्था मर्या., जठारवाडी, ता. करवीर, जि. कोल्हापूर
श्री. भिमराव रामचंद्र खाडे

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १४.१०.२००७ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. -- |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. २०.११.२००७ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. १८.१२.२००७ |

८ **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**

संस्थेच्या दि.६.८.२००७ च्या जनरल सभेचे प्रोसीडिंग नक्कल, संचालक मंडळाने सभेपुढे सादर केलेल्या अहवालाची नक्कल, दि.१.५.२००७ ते आज अखेर संपूर्ण रेकॉर्ड पाहण्यास मिळावे, नूतन संचालक मंडळ यादी व त्यांची येणे-बाकी यादी नक्कल, दि. ३१.१०.२००७ रोजी किती व्यक्तींना / सभासदांना संस्थेने दूध पुरवठा करणेस पाठविलेल्या नोटिशीची प्रत, इ. माहिती सहीशिक्यानिशी

## विवेचन

श्री केदारलिंग सहकारी दूध व्यावसायिक संस्थेने माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ लागू नसल्याच्या कारणावरुन माहिती देण्याचे नाकारले. अपिलीय प्राधिकारी तथा सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, कोल्हापूर यांनी १५ दिवसात माहिती देण्याचा आदेश देऊनही संस्थेच्या सचिवांनी माहिती दिली नाही. संस्थेची जागा शासकीय गायरानाची आहे, म्हणून संस्था सार्वजनिक प्राधिकरण ठरत असल्यामुळे जन माहिती अधिकाऱ्यांना शास्ती करावी, अशी मागणी अपीलकर्ता श्री. नंदकुमार वसंत खाडे यांनी राज्य माहिती आयोगाकडील अपिलात केली आहे.

आपल्या संस्थेला कोणतेही शासकीय अनुदान नाही. तसेच संस्थेने जमीन खरेदी केलेली आहे. श्री. खाडे तीन वर्षे संस्थेचे अध्यक्ष होते. नंतर निवडणुकीत ते पराभूत झाल्यामुळे संस्थेला त्रास देण्याच्या उद्देशाने ते सातत्याने विविध प्रकारचा पत्रव्यवहार व अर्ज करीत असतात. माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ लागू होत नसूनही सन २००३ पासून ११ वेळा त्यांना माहिती देण्यात आली आहे, असे संस्थेचे सचिव श्री. भिमराव रामचंद्र खाडे यांनी लेखी व तोंडी नमूद केले.

उभय बाजूंनी दाखल केलेली कागदपत्रे व निवेदने पाहता उपरोक्त संस्थेला माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ लागू होत नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र, पुणे खंडपीठ.

**( विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ, पुणे**

**पुणे**
**दि. १६ .१०.२००९**